२२२४४/४५

परवानगी वर्ष :- २०१०-२०११
माध्यम : - इंग्रजी
**कायम विना अनुदान**

जा.क.शिउसं/ माध्य-३/१२/प्र.मा./पुवि/२०१२
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : - 6 SEP 2012

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद,पुणे.

विषय :- प्रथम मान्यताबाबत..(सन २०१०-२०११ साठी एक वर्षासाठी)
**वसुंधरा सेकंडरी स्कूल,एरंडवणा,पुणे-४**

संदर्भ- १. शासन पत्र क्र. नमाशा-२००९/(७१७/०९)माशि-१,दि.२४.०८.२००९
२. या कार्यालयाचे पत्र क्र.माध्य ३/१२/नमाशा/पुवि/०९-१०/ दिनांक २२.०९.२००९
३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे यांचे पत्र क्रमांक जिप/माध्य/१७८१/१२ दिनांक १४.०८.२०१२

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की,माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१ , ३.२ , व ३.३ अन्वये **वसुंधरा इन्स्टि.ऑफ एज्यु.सोशल वेलफेअर,पुणे-४.**संचलित **वसुंधरा सेकंडरी स्कूल,एरंडवणा,पुणे-४** या माध्यमिक शाळेच्या इयत्ता **आठवीच्या वर्गास सन २०१०-२०११** या शैक्षणिक वर्षासाठी **जून-२०१० पासून <u>एक वर्षासाठी कायम</u> <u>विना अनुदान तत्वावर</u>** आपली स्पष्ट शिफारस विचारात घेता **तात्परती** प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक )जिल्हा परिषद यांनी संबंधित शाळा खालील अटींची पूर्तता करीत आहे किंवा कसे १. याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्यावेळी खालील अटी संस्थेने/शाळेने पूर्ण केल्या आहेत किंवा कसे १ याबाबतचा अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा..

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तिची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दर वर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची (मुलां-मुलींसाठी)सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे कडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेऊन त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११.शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सूचनांची पुर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.

(मागे पहा..)

१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
**१७. जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.**

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.
२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.
३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी.व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील.
५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे.वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ :-१) शासन पत्र क्रमांक याचिका-२००९/प्र.क्र.२४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर २००९.
२) संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२००९/६४११६/याचिका/१५ क(८)९३४४ दिनांक २४ सप्टेंबर-२००९.

टीप :- **जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.४.०९ रोजी दिलेल्या आदेशानुसार संबंधित संस्थेने/शाळेने विहित मुदतीत पूर्तता न केल्यास सदरचे आदेश आपोआप रद्द होतील याची नोंद घ्यावी.**

स्थळ प्रतीवर मा.शि.उ.सं.यांची स्वाक्षरी असे.

(धनाजी बुटे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-**१करिता**

**प्रत माहितीस्तव व तात्काळ कार्यवाहीसाठी,**
१. मुख्याध्यापक, **वसुंधरा सेकंडरी स्कूल,एरंडवणा,पुणे-४**
२. अध्यक्ष/सचिव **वसुंधरा इन्स्टि.ऑफ एज्यु.सोशल वेलफेअर,पुणे-४**
३. निवडनस्ती.

19

पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र.शिक्षण/माध्य/नमाशा/ ९१०९ /१२
पुणे दिनांक ९ /९/२०१२.

प्रति,

मा.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे.

विषय - **प्रथम मान्यता नुतणीकरण करणेबाबत**
**वसुंधरा सेकंडरी स्कूल, पौड रोड, कोथरुड पुणे-३८**

संदर्भ - १) आपलेकडील पत्र जा.क्र.शिउसं/माध्य-३/१२/प्र.मा./पुवि/२०१२/२२२४४/४६ दिनांक ६/९/२०१२.

२) संस्थेकडील प्रस्ताव दिनांक ६/९/२०१२

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये **वसुंधरा इन्स्टि.ऑफ एज्यु.अन्ड सोशल वेल्फेअर पुणे** संचलित **वसुंधरा सेकंडरी स्कूल, पौड रोड, कोथरुड पुणे-३८** या इंग्रजी माध्यमिक विदयालयातील इ.८ वीच्या वर्गास जून २०१० पासुन एक वर्षासाठी तात्पूरती कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर संस्थेने सन २०११-१२ या वर्षासाठी प्रथम मान्यता नुतणीकरण करणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला असुन २०१२-१३ ची वार्षिक तपासणीही करण्यात आलेली आहे संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये सर्व बाबींची पूर्तता करण्यात आलेली आहे.

तरी **वसुंधरा सेकंडरी स्कूल, पौड रोड, कोथरुड पुणे-३८** या इंग्रजी माध्यमिक विदयालयास सन २०११-१२ या शैक्षणीक वर्षासाठी कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता नुतणीकरणाने मिळणेस शिफारस आहे.

आपला विश्वासू,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परीषद, पुणे.

सोबत - वरीलप्रमाणे प्रस्ताव

Smita Bhambure
Headmistress
Vasundhara Secondary School, Pune

<u>कायम विना अनुदान</u>

पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र.शिक्षण/माध्य/नैवा/१६०७/१२
पुणे दिनांक ७ /९/२०१२

प्रति,

**अध्यक्ष / सचिव / मुख्याध्यापक,**
वसुंधरा इन्स्टि.ऑफ एज्यु.अन्ड सोशल वेल्फेअर पुणे संचलित
वसुंधरा सेकंडरी स्कूल, पौड रोड, कोथरुड पुणे-३८

<u>विषय</u> - **<u>नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत</u>**
इ.९ वी (सन २०११-१२) व इ.१० वी (सन २०१२-१३)

<u>संदर्भ</u> - १) मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र जा.क्र.शिउसं/ माध्य-३/१३/प्र.मा./पुवि/२०१२/२२२४४/४६ दि.६/९/२०१२.
२) आपलेकडील प्राप्त प्रस्ताव दिनांक ६/९/२०१२

आपल्या **वसुंधरा इन्स्टि.ऑफ एज्यु.अन्ड सोशल वेल्फेअर पुणे** संचलीत **वसुंधरा सेकंडरी स्कूल, पौड रोड, कोथरुड पुणे-३८** या कायम विना अनुदानित इंग्रजी माध्यमिक शाळेतील इ.८ वीच्या वर्गास जून २०१० पासुन कायम विना अनुदान तत्वावर उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांनी परवानगी / प्रथम मान्यता दिलेली आहे.

सदर विदयालयात जून २०११ पासून इ. ९ वी व जुन २०१२ पासुन इ.१० वीचा वर्ग नैसर्गीक वाढीने सुरु केला असुन सदर दोन्ही वर्गांना अनुक्रमे जून २०११ व जुन २०१२ पासून नैसर्गिक वाढीने कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परीषद, पुणे.

प्रत - मा.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सादर.

Headmistress
Vasundhara Secondary School, Pune